# राज्य पाणी व स्वच्छता मिशन
# (SWSM)

Har Ghar Jal
Jal Jeevan Mission

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

१ ला मजला, सिडको भवन (दक्षिण कक्ष),
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४

दूरध्वनी क्र. ०२२-२७५६२५४६, २७५६२३६३ ईमेल : allbharatnirman@gmail.com


पत्र क्र. रापावस्वमि/जजीमि/पापुशा -०१ / प्र.क्र.०२ /२०२० दिनांक :- ०५/१०/२०२०

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे**

प्रति
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय : जल जीवन मिशन - १०० दिवसांच्या मोहीमेअंतर्गत शाळा व अंगणवाडयांना शाश्वत पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत...

संदर्भ : १.केंद्र शासनाचे पत्र क्र. ११०११/५८/२०२०-JJM.I, दि.०१/१०/२०२०
२. ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रमांक -ग्रापनी २०२०/प्र.क्र.२०/पंरा-२, दि.१२/०५/२०२०

विषयांकित प्रकरणी केंद्र शासनाचे पत्र अवलोकनार्थ व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

मा.पंतप्रधान यांनी दि.२९/०९/२०२० रोजी १०० दिवासांच्या मोहिमेअंतर्गत सर्व शाळा व अंगणवाडयांना जल जीवन मिशनअंतर्गत शाश्वत पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्याचे घोषित केले आहे.

याअनुषंगाने संदर्भ पत्र क्र.०१ अन्वये केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या पत्रामधील मुद्दा क्र.४(i) नुसार दि.०२/१०/२०२० रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये सदर विषयी कालबध्द नियोजन करून गावांतील सर्व कुटुंबांना नळजोडण्या देण्याचे नियोजन करणे आणि पुढील १०० दिवसांमध्ये शाळा, अंगणवाडया आणि सार्वजनिक संस्था/इमारती इत्यादी ठिकाणी जल जीवन मिशनअंतर्गत शाश्वत पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत ठराव करण्याचे सूचित केले आहे. परंतु ग्राम विकास विभागाकडून निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार शासनाच्या पुढील आदेशापर्यत ग्रामसभा घेता येणार नाही. यामुळे सदर विषयी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये ठराव घेण्याबाबत सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात. ठरावाबाबतचा नमुना सोबत जोडला आहे.

त्याचप्रमाणे जल जीवन मिशनअंतर्गत १०० दिवसांच्या मोहीमेत खालीलप्रमाणे नियोजन करून कार्यवाही करण्यात यावी. यासाठी जिल्हास्तरावर उपलब्ध असलेला निधी १५ वा वित्त आयोग/ग्राम निधी/DPDC/स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार/खासदार निधी)/ जिल्हा परिषद सेस/ गौण खनिज/जल जीवन मिशन खर्च करण्यात यावा.

१. सर्व शाळा, अंगणवाडया व इतर सार्वजनिक इमारती यांना नळजोडणीव्दारे पाणी पुरवठा उपलब्ध करून देणे.
२. आदिवासी, डोंगराळ, वन क्षेत्रात विखुरलेल्या गावे/वाडयांना आवश्यकतेनुसार सौर ऊर्जेवर आधारीत पाणी पुरवठा योजना करणे.

३. १०० दिवसांच्या मोहिमेतर्गत ज्या ठिकाणी नळजोडण्या देणे शक्य नाही,अशा ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना म्हणून शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी शुध्दिकरण संयंत्रे (Purifiers, सार्वजनिक पाणी शुध्दिकरण संयंत्रे (CWPPs) बसविणे. तसेच दुष्काळसदृश्य भागातील शाळा व अंगणवाडयांमध्ये पाण्याची शाश्वतता राखण्यासाठी सार्वजनिक इमारतीमध्ये पाऊस पाणी संकलन करणे.

४. ज्या शाळा व अंगणवाडयांना पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे अश्यांच्या दैनंदिन नोंदी केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर करणे.

५. शाळा व अंगणवाडयांमधील पिण्याच्या पाण्याची चाचणी करून शुध्द पाणी पुरवठा उपलब्ध होत असल्याची खात्री करणे.

६. शाळा व अंगणवाडयांमधील शौचालयांना पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.

७. मुलांच्या आरोग्याचे महत्व पटवून देण्यासाठी टेलिव्हिजन, रेडीओ, सोशल मिडीया या माध्यमाचा वापर करून प्रचार प्रसिध्दी करणे.

उपरोक्त बाबींनुसार १०० दिवसांमध्ये जिल्हयांतील सर्व शाळा व अंगणवाडयांना पिण्याचे पाणी व शौचालयांना पाणी उपलब्ध करून देण्यात यावे, जेणेकरून मा. पंतप्रधानांनी घोषित केलेली १०० दिवसांची विशेष मोहिम पूर्णपणे यशस्वी होईल.

सोबत : वरीलप्रमाणे

5/10/20

(आर. विमला)भाप्रसे
मिशन संचालक
राज्य पाणी व स्वच्छता मिशन

प्रत : मा. अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.
प्रत : मा. विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी सादर.
प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.